**FOREST DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LIMITED**
(A Government of Maharashtra Enterprise)

प्रशा/आस्था-१/न.क्र.५८१/प्र.क्र.६१५/२०२५-२६/ 1716 दिनांक 29 JUL 2025

# आदेश.

विषयः- एफडीसीएम लिमिटेडचे मंजूर नविन आकृतीबंधानुसार वनपरिक्षेत्र अधिकारी संवर्गातील रिक्त पदे तात्पूरत्या स्वरुपात वनपाल संवर्गात अवनत करण्याबाबत.

संदर्भः- १) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.एफडीसी-२०२२/प्र.क्र.१४१/फ-५, दि.०९/०६/२०२५
२) या कार्यालयाचे पत्र क्र.प्रशा/आस्था-१/न.क्र.७१/प्र.क्र.१२५/१२१४, दि. २४/०६/२०२५

संदर्भिय शासन निर्णय क्र. १ अन्वये एफडीसीएम मधील विविध संवर्गातील अधिकारी/ कर्मचारी यांचे एकूण १३५१ पदांना मंजूरी प्रदान करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्र. २ अन्वये प्रदेश/ विभागवार पदांचे वाटप करण्यात आले आहे.

प्रदेशनिहाय **वनपाल** यांचे खालीलप्रमाणे मंजूर, भरलेली व अतिरिक्त पदे आहेत.

| अ.क्र. | प्रदेश | मंजूर | भरलेली | अतिरिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | नाशिक | 40 | 53 | +13 |
| २ | नागपूर | 82 | 83 | +1 |
| ३ | व्य.सं.कार्यालय | 0 | 1 | +1 |

२.० उक्त प्रमाणे सध्या वनपाल संवर्गाची नाशिक प्रदेशात १३ पदे, नागपूर प्रदेशात १ पद व व्यवस्थापकीय संचालक कार्यालय १ पद अतिरिक्त झालेले आहेत. त्यामुळे मंजूर आकृतीबंधापेक्षा अतिरिक्त कार्यरत वनपाल पदांचे वेतन व भत्ते अदा करण्यास तांत्रिक अडचण निर्माण झाली आहे.

तसेच प्रदेशनिहाय **वनपरिक्षेत्र अधिकारी** यांचे खालीलप्रमाणे मंजूर, भरलेली व रिक्त पदे आहेत.

| अ.क्र. | प्रदेश | मंजूर | भरलेली | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | नाशिक | 13 | 10 | - 3 |
| २ | नागपूर | 32 | 25 | - 7 |
| ३ | व्य.सं.कार्यालय | 4 | 3 | - 1 |

**३.०** उक्त प्रमाणे वनपाल संवर्गाची नाशिक प्रदेशात **१३** पदे, नागपूर प्रदेशात **१** पद, व व्यवस्थापकीय संचालक कार्यालयात **१** पद अतिरिक्त झाल्याने सदर वनपाल यांचे खालील प्रमाणे समायोजन करण्यात येत आहे.

**४.०** नाशिक प्रदेशात वनपरिक्षेत्र अधिकारी संवर्गाची **३** पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदे तात्पूरत्या स्वरुपात वनपाल स्तरावर अवनत (downgrade) करुन, सदर रिक्त पदावर नाशिक प्रदेशातील अतिरिक्त ठरणा-या ३ वनपालांना सामावून घेण्यात येत आहे.

५.० नागपूर प्रदेशात वनपरिक्षेत्र अधिकारी संवर्गाची ७ पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदे तात्पूरत्या स्वरुपात अवनत (downgrade) करुन सदर पदावर नागपूर प्रदेशात अतिरिक्त ठरलेल्या १ वनपाल यांना सामावून घेण्यात येत आहे. तसेच उर्वरित ६ रिक्त पदावर नाशिक प्रदेशातील अतिरिक्त ठरणा-या वनपालांचे वरील परिच्छेद क्र. ४ अन्वये सामावून घेतलेल्या वनपालानंतर अतिरिक्त ठरलेल्या ६ वनपाल यांना नागपूर प्रदेशात सामावून घेण्यात येत आहे.

६.० व्यवस्थापकीय संचालक कार्यालयात वनपरिक्षेत्र अधिकारी संवर्गाचे १ पद रिक्त आहेत. सदर रिक्त पद तात्पूरत्या स्वरुपात अवनत (downgrade) करुन सदर रिक्त पदावर व्यवस्थापकीय संचालक कार्यालयात अतिरिक्त झालेल्या १ वनपाल यांना सामावून घेण्यात येत आहे.

७.० वरीलप्रमाणे ११ वनपाल यांचे समायोजन केल्यानंतर उर्वरित नाशिक प्रदेशातील अतिरिक्त झालेल्या कनिष्ठ ४ वनपाल यांना वनरक्षक या पदावर पदावनत करण्याची कार्यवाही संबंधित प्रादेशिक व्यवस्थापक यांनी करावी.

८.० प्रादेशिक व्यवस्थापक, नाशिक प्रदेश, नाशिक यांनी उक्त प्रमाणे ६ वनपाल यांचे नागपूर प्रदेशात स्थानांतरण व पदस्थापना करण्याचे अनुषंगाने यांची नावे या कार्यालास सादर करावी. त्यांचे नावे प्राप्त होताच त्यांचे स्थानांतरण व पदस्थापनेचे आदेश वेगळयाने करण्यात येतील.

९.० सदर आदेश तात्काळ प्रभावाने अंमलात येईल.

१०.० नियंत्रक अधिका-यांनी अनुपालन अहवाल सत्वर सादर करावा.

29/7/25

(नरेश झुरमुरे)
**व्यवस्थापकीय संचालक**

प्रति,
प्रादेशिक व्यवस्थापक,
एफडीसीएम लिमिटेड
नागपूर प्रदेश / नाशिक प्रदेश.

प्रतिलिपी:- आदेश फाईल.
प्रतिलिपी:- एफडीसीएम संकेतस्थळ www.fdcm.co.in